लोकमत

# नवीन शैक्षणिक धोरणानुसार संस्थांनी वाटचाल करावी

## चंद्रशेखर बावनकुळे : क. का. वाघ शिक्षण संस्थेतर्फे सत्कार

**नाशिक :** नवीन शैक्षणिक धोरण व एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स)च्या साहाय्याने वर्ष २०४७ चा विचार करून शैक्षणिक संस्थांनी वाटचाल करावी. त्यामुळे देशाच्या विकासात भर पडेल. देशाच्या विकासात शिक्षणाचे महत्त्व मोलाचे असल्याचे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

के. के. वाघ शिक्षण संस्थेत शनिवारी (दि. २४) रोजी आयोजित सत्कार समारंभ



कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थान आमदार डॉ. राहुल आहेर यांनी भूषविले. याप्रसंगी आमदार दिलीप बनकर, सीमा हिरे, नितीन पवार, किशोर दराडे व शैक्षणिक, सहकार, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. भूषण कर्डिले यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ व जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ यांनी उपस्थित मान्यवरांचा देऊन सत्कार केला.